2 9 SEP 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या 'व्हॉईस ॲक्टिंग' कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग विभाग आणि विंडोज फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्हॉईस ॲक्टिंग' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. ३० रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत मास कम्युनिकेशन विभागात ही कार्यशाळा होणार आहे.

व्हॉईस आर्टिस्ट व लेखक भरत दैनी हे कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार आहेत. चित्रपट, दूरदर्शन, जाहिरात, डबिंग तसेच विविध दृक-श्राव्य माध्यमांमध्ये आवाजाचा प्रभावी वापर, आवाजातील चढ-उतार, संवादफेक, व्यक्तिरेखेनुसार आवाजातील बदल, आवाजासाठी योग आणि प्राणायाम आदी बाबींवर ते मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे राहणार आहेत. बी. ए. फिल्म मेकिंग विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि विंडोज फिल्म प्रोडक्शन, कोल्हापूरचे संचालक चंद्रशेखर गुरव यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून इच्छुकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

2 9 SEP 2026

तरुण भारत

# व्हॉईस ॲक्टिंग कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि विंडोज फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्हॉइस ॲक्टिंग' कार्यशाळेचे आयोजन केले आहे. बुधवार दि. ३० रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत मास कम्युनिकेशन विभागात ही कार्यशाळा होणार आहे. प्रसिद्ध व्हॉइस आर्टिस्ट व लेखक भरत दैनी हे कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे राहणार आहेत. कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
29 SEP 2026

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात ३० सप्टेंबरला 'व्हॉइस ॲक्टिंग' कार्यशाळा

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि विंडोज फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्हॉइस ॲक्टिंग' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत मास कम्युनिकेशन विभागात ही कार्यशाळा होणार आहे.

प्रसिद्ध व्हॉइस आर्टिस्ट व लेखक भरत दैनी हे कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार आहेत. चित्रपट, दूरदर्शन, जाहिरात, डबिंग तसेच विविध दृक्-श्राव्य माध्यमांमध्ये आवाजाचा प्रभावी वापर, आवाजातील चढ-उतार, संवादफेक, व्यक्तिरेखेनुसार आवाजातील बदल, आवाजासाठी योग आणि प्राणायाम आदी बाबींवर ते मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे राहणार आहेत. बी.ए. फिल्म मेकिंग विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि विंडोज फिल्म प्रोडक्शन, कोल्हापूरचे संचालक चंद्रशेखर गुरव यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

2 9 SEP 2026
तरूण भारत

# मौनी विद्यापीठात बुधवारी शैक्षणिक मुक्त संवाद

त. भा. प्रतिनिधी

**■ शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत उपस्थित राहणार**

**गारगोटी :** येथील श्री मौनी विद्यापीठाच्या वतीने ग्रामीण भागातील शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, तंत्रज्ञानस्नेही आणि भविष्याभिमुख करण्याच्या उद्देशाने भुदरगड तालुक्यातील शिक्षक व संस्था प्रतिनिधी यांच्यासाठी 'मुक्त संवाद' हा विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे. बुधवारी (दि. ३०) सकाळी ११ वाजता श्री मौनी विद्यापीठातील प्रांगणातील जी. टी. सी. हॉलमध्ये हा कार्यक्रम होईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असतील. नाबार्डचे माजी अध्यक्ष व श्री मौनी विद्यापीठाचे महासंचालक डॉ. यशवंत थोरात हे विषयाची सविस्तर मांडणी करून ग्रामीण शिक्षणाच्या संदर्भातील तंत्रज्ञानाच्या संधी, आव्हाने आणि भविष्यातील दिशा यावर उपस्थितांना मार्गदर्शन करतील. या कार्यक्रमासाठी गरवारे टेक्निकल फायबर्स पुणेचे प्रमुख डॉ. संजय चराटे, डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी देवश्री सतेज पाटील व राजाराम कॉलेजच्या माजी प्राचार्या डॉ. अनिता बोडके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक अंतर वाढण्याची शक्यता आहे. हे अंतर कमी करण्यासाठी ग्रामीण शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील नेतृत्वाने एकत्र येणे आवश्यक आहे. या संवादाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील अडचणी मांडून, अनुभवांची देवाणघेवाण करून ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार तंत्रज्ञानयुक्त शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत ठोस व व्यवहार्य उपायांवर चर्चा घडवून आणली जाईल, हा मुक्त संवाद कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

पत्रकार परिषदेस मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधुकर देसाई, संचालक डॉ. पी. बी. पाटील, कर्मचारी प्रतिनिधी डॉ. अरविंद चौगले, प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे, उपप्राचार्य डॉ. एस. बी. देसाई आदी उपस्थित होते.

2 9 SEP 2026
सकाळ

# 'गाथा स्वातंत्र्य सैनिकांची' ग्रंथाचे गुरुवारी प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्य सैनिकांची' या ग्रंथाचे प्रकाशन गुरुवारी (ता. १ ऑक्टोबर) दुपारी चार वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्यातर्फे होणाऱ्या या कार्यक्रमात विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आणि वारणानगर येथील वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या विशेष उपस्थितीत प्रकाशन होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत असतील. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त विद्यापीठाने आपल्या 'शिववाणी' यूट्युब वाहिनीवरून 'गाथा स्वातंत्र्य सैनिकांची' ही दैनंदिन मालिका वर्षभर सलग चालविली. या मालिकेतील स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवनकार्याचे शब्दांकन करून त्याचे ग्रंथरूपात संपादन केले. डॉ. अविनाश पाटील, दत्तात्रय मचाले यांनी संपादन केले आहे.

2 9 SEP 2026
पुढारी

# 'यूजीसी' नेट पात्र उमेदवारांना पीएच.डी. प्रवेश अर्जाची संधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'यूजीसी' नेट जून २०२६ परीक्षेतील इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र विषयांच्या पुनर्परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना पीएच.डी. प्रवेश २०२६-२७ प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने ऑनलाईन अर्ज मागविले आहेत. इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र विषयातील यूजीसी नेट पात्र उमेदवारांसाठी पीएच.डी. प्रवेशाचे ऑनलाइन अर्ज १ ऑक्टोबरपर्यंत भरता येणार आहेत. केवळ यूजीसी नेटमध्ये या तीन विषयांत पात्र ठरलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावा, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

29 SEP 2026

पुढारी

# 'गाथा आपल्या स्वातंत्र्य सैनिकांची' ग्रंथाचे गुरुवारी प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्य सैनिकांची' ग्रंथाचा प्रकाशन समारंभ आयोजित केला आहे. गुरुवारी, दि. १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी चार वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात कार्यक्रम होईल. इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष व कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम होणार आहे. माजी कुलगुरू प्रा. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आणि वारणानगर येथील वारणा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम होईल. कुलगुरू प्रा. आर. के. कामत अध्यक्षस्थानी असतील.

2 9 SEP 2026

पुढारी

# नाईट कॉलेजचे नियतकालिक स्पर्धेत यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०२४-२५ च्या बिगर व्यावसायिक गटातून नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्समधील प्रांजली पवारला माहितीपर लेखन सूचनालेख लेखन प्रकारात 'तृतीय' क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, संचालक अॅड. वैभव पेडणेकर, अॅड. अमित बाडकर, प्राचार्य डॉ. उत्तम पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

2 9 SEP 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अँकर मास कम्युनिकेशन, बी. ए. फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांची चित्रनगरीला भेट : अनुभवले पडद्यामागचे विश्व

# विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी घेतले चित्रपट निर्मितीचे धडे

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

पडद्यावर दिसणारे गाव, वाडे, पोलीस ठाणे, रुग्णालय, महाविद्यालय, रेल्वे स्टेशन किंवा मंदिर प्रत्यक्षात कसे उभे केले जाते, याचा प्रत्यक्ष अनुभव शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन आणि बी.ए. फिल्म मेकिंग विभागाच्या विद्यार्थ्यांनी घेतला. कोल्हापूर चित्रनगरीतील विविध चित्रीकरण स्थळांना भेट देत विद्यार्थ्यांनी चित्रपट निर्मिती आणि कलादिग्दर्शनामागील सर्जनशीलतेचे बारकावे जाणून घेतले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन व बीए फिल्म मेकींगच्या विद्यार्थ्यांनी चित्रनगरीतील सेट निर्मितीची माहिती घेतली.**

मास कम्युनिकेशन आणि बी.ए. फिल्म मेकिंग विभागातील प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. अभ्यासक्रमातील चित्रपट निर्मितीच्या संकल्पना प्रत्यक्ष चित्रीकरणाच्या वातावरणात समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना या भेटीत मिळाली.

चित्रनगरीतील जुना वाडा, नवा वाडा, चाळ, बंगला, गावभाग तसेच मालिकेसाठी उभारण्यात आलेला क्रोमा फ्लोअर विद्यार्थ्यांनी पाहिला. याशिवाय सुरू असलेल्या दोन–तीन चित्रीकरण फ्लोअर्सनाही विद्यार्थ्यांनी भेट दिली. एकाच इमारतीत वेगवेगळ्या कथानकांसाठी पोलीस ठाणे, रुग्णालय, घर, महाविद्यालय आणि शासकीय कार्यालय उभारण्यात आल्याचे विद्यार्थ्यांनी पाहिले.

रेल्वे स्टेशन, नदीघाट आणि मंदिराचे सेट्सही विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेत होते. प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेली ठिकाणे मर्यादित जागेत आणि उपलब्ध साधनसामग्रीच्या आधारे पडद्यावर विश्वासार्ह दिसतील अशा पद्धतीने कशी साकारली जातात, याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. चित्रनगरीचे कर्मचारी विक्रम विष्णू वडर आणि सचिन कुडचे यांनी विद्यार्थ्यांना विविध लोकेशन्सची माहिती देत संपूर्ण परिसराची सफर घडवून आणली. दरम्यान, अभिनेते उमेश बोळके आणि 'मालिकेतील बाल

**■ पोलीस ठाणे, रुग्णालयापासून रेल्वे स्टेशनपर्यंत हुबेहूब निर्मिती**

विष्णूची भूमिका साकारणारा बालकलाकार तक्षशील भोसले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिक्षक अनुप जत्राटकर आणि डॉ. कविता गगराणी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ही शैक्षणिक भेट यशस्वी करण्यासाठी मास कम्युनिकेशन आणि बी.ए. फिल्म मेकिंग विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि कोल्हापूर चित्रनगरीचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप भांदिगरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

2 9 SEP 2026
लोकमत

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहिरात

शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणालीमार्फत नवीन महाविद्यालय व नवीन विद्याशाखा इ. सुरू करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Affiliation ➔ Affiliation T-२ ➔ Information Lists या लिंकवर विद्यापीठाची विस्तृत जाहिरात, शासन निर्णय, शासन पत्र व वार्षिक बृहत आराखडा मान्यता प्राप्त स्थळ बिंदूची यादी, तसेच सदरचे प्रस्ताव New College Permission System (NCPS) https://htedu.maharashtra.gov.in/NCPS या ऑनलाईन प्रणालीमार्फत संस्थेने / महाविद्यालयाने विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणेबाबतचे पत्र ठेवण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरून शासन मान्यतेच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२७-२८च्या वार्षिक बृहत आराखड्यानुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक संस्था, संलग्न महाविद्यालये यांनी दि. ३०-०९-२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणालीमार्फतच विद्यापीठ कार्यालयीन वेळेतच प्रस्ताव ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

तसेच भारतीय विधिज्ञ परिषदेने दि. ०५-०३-२०२६ रोजीच्या नोटिफिकेशनद्वारे ०३ वर्षांचा मोराटोरिअमचा कालावधी रद्द केलेला आहे. त्यामुळे विधि महाविद्यालयांसाठी दि. १८-०९-२०२५ शासन निर्णयामधील तरतुदीनुसार NCPS या ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रस्ताव सादर करावेत.

**उपरोक्त शासन पत्राच्या अनुषंगाने पोस्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.**

प्रथम शुल्क बँकेत जमा करून प्रस्ताव दि. ३०/०९/२०२६ नंतर सादर करता येणार नाही. शुल्क व ऑनलाईन भरलेल्या प्रस्तावाची प्रत एकाचवेळी या कार्यालयास दि.३०/०९/२०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. पोस्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव तसेच विलंबाने पोहोच होणारे प्रस्ताव व शुल्क यावर कार्यवाही केली जाणार नाही.

**टीप : शासनाकडून मंजूर केलेल्या स्थळ बिंदूनुसारच संस्था / महाविद्यालयांनी ऑनलाईन (Online) अर्ज भरावेत.**

सही/-

क्र. शिवाजीवि/संलग्नता/टी-२/१५०४ — **डॉ. व्ही. एन. शिंदे**

दिनांक : २९-०९-२०२६ — कुलसचिव

महा न्यूज & व्ह्यूज




# महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' ग्रंथाचे प्रकाशन

**कोल्हापूर (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज ) :**

शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात कार्यक्रम होईल. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित केला आहे.

विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आणि वारणानगर येथील वारणा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम होईल. कुलगुरू प्रा. राजनिश कामत अध्यक्षस्थानी असतील.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाने आपल्या 'शिववाणी' युट्यूब वाहिनीवरुन




'गाथा स्वातंत्र्यसैनिकांची' ही दैनंदिन मालिका वर्षभर सलग चालविली. या मालिकेतील स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनकार्याचे शब्दांकन करून त्याचे ग्रंथरुपात संपादन करण्यात आले आहे. डॉ. अविनाश पाटील आणि डॉ. दत्तात्रय मचाले यांनी संपादन केले आहे. नव्या पिढीला स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आणि स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. अरुण भोसले, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अविनाश पाटील तसेच कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. इतिहास, स्वातंत्र्य चळवळ विषयांत रस असलेल्या नागरिकांनी, विद्यार्थी, संशोधक आणि विद्यापीठातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

महा न्यूज & व्ह्यूज




# महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' ग्रंथाचे प्रकाशन

**कोल्हापूर (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज ) :**

शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात कार्यक्रम होईल. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित केला आहे.

विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आणि वारणानगर येथील वारणा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम होईल. कुलगुरू प्रा. राजनिश कामत अध्यक्षस्थानी असतील.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाने आपल्या 'शिववाणी' युट्यूब वाहिनीवरुन




'गाथा स्वातंत्र्यसैनिकांची' ही दैनंदिन मालिका वर्षभर सलग चालविली. या मालिकेतील स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनकार्याचे शब्दांकन करून त्याचे ग्रंथरुपात संपादन करण्यात आले आहे. डॉ. अविनाश पाटील आणि डॉ. दत्तात्रय मचाले यांनी संपादन केले आहे. नव्या पिढीला स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास आणि स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. अरुण भोसले, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अविनाश पाटील तसेच कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. इतिहास, स्वातंत्र्य चळवळ विषयांत रस असलेल्या नागरिकांनी, विद्यार्थी, संशोधक आणि विद्यापीठातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

2 9 SEP 2026

सकाळ

# राज्यपाल जिष्णू देव वर्मा आज कोल्हापुरात



कोल्हापूर, ता. २८ : राज्यपाल जिष्णू देव वर्मा उद्या (ता. २९) कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. जिष्णू देव वर्मा फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशन व महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'रिझर्व्ह बायर-सेलर मीट'ला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर ते करवीरनिवासिनी श्री अंबाबाई मंदिरात दर्शन घेतील.

वर्मा यांचे कोल्हापूर विमानतळावर सकाळी दहा वाजता आगमन होईल. त्यानंतर ते हॉटेल सयाजीकडे रवाना होतील. सकाळी साडेदहा ते सव्वाअकरा या वेळेत आयोजित खरेदीदार-विक्रेता मेळाव्यास ते उपस्थित राहतील.

## वाहतूक मार्गात बदल

■ राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या जिल्हा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी शहरातील वाहतूक मार्गात महत्त्वाचे बदल जाहीर केले आहेत. तसेच काही ठिकाणी 'नो पार्किंग झोन' घोषित केले आहेत. याची नोंद वाहनधारक व नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस निरिक्षक नंदकुमार मोरे यांनी पत्रकाद्वारे केले.

## सविस्तर दौरा असा

- सकाळी १० वाजता - कोल्हापूर विमानतळावर आगमन
- १० : २५ मिनिटे - हॉटेल सयाजी येथे आगमन
- १० : ३० ते ११ : १५ - 'रिझर्व्ह बायर-सेलर मीट'
- ११ : ४५ - अंबाबाई मंदिरात आगमन
- १२ : १० - जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन
- १२ : १५ ते १ - जिल्हा प्रशासनाकडून सादरीकरण
- १ : ०५ - शासकीय विश्रामगृहात आगमन
- २ : ३० ते ३ - प्रमुख व्यक्तींशी भेट
- ३ : १५ - कोल्हापूर विमानतळावर आगमन
- ३ : २० - मुंबईकडे प्रयाण..

2 9 SEP 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या 'व्हॉईस ॲक्टिंग' कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग विभाग आणि विंडोज फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्हॉईस ॲक्टिंग' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. ३० रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत मास कम्युनिकेशन विभागात ही कार्यशाळा होणार आहे.

व्हॉईस आर्टिस्ट व लेखक भरत दैनी हे कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार आहेत. चित्रपट, दूरदर्शन, जाहिरात, डबिंग तसेच विविध दृक-श्राव्य माध्यमांमध्ये आवाजाचा प्रभावी वापर, आवाजातील चढ-उतार, संवादफेक, व्यक्तिरेखेनुसार आवाजातील बदल, आवाजासाठी योग आणि प्राणायाम आदी बाबींवर ते मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे राहणार आहेत. बी. ए. फिल्म मेकिंग विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि विंडोज फिल्म प्रोडक्शन, कोल्हापूरचे संचालक चंद्रशेखर गुरव यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून इच्छुकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

2 9 SEP 2026

तरुण भारत

# व्हॉईस अॅक्टिंग कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि विंडोज फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्हॉइस अॅक्टिंग' कार्यशाळेचे आयोजन केले आहे. बुधवार दि. ३० रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत मास कम्युनिकेशन विभागात ही कार्यशाळा होणार आहे. प्रसिद्ध व्हॉइस आर्टिस्ट व लेखक भरत दैनी हे कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे राहणार आहेत. कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
29 SEP 2026

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठात ३० सप्टेंबरला 'व्हॉइस ॲक्टिंग' कार्यशाळा

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि विंडोज फिल्म प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्हॉइस ॲक्टिंग' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत मास कम्युनिकेशन विभागात ही कार्यशाळा होणार आहे.

प्रसिद्ध व्हॉइस आर्टिस्ट व लेखक भरत दैनी हे कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार आहेत. चित्रपट, दूरदर्शन, जाहिरात, डबिंग तसेच विविध दृक्-श्राव्य माध्यमांमध्ये आवाजाचा प्रभावी वापर, आवाजातील चढ-उतार, संवादफेक, व्यक्तिरेखेनुसार आवाजातील बदल, आवाजासाठी योग आणि प्राणायाम आदी बाबींवर ते मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे राहणार आहेत. बी.ए. फिल्म मेकिंग विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि विंडोज फिल्म प्रोडक्शन, कोल्हापूरचे संचालक चंद्रशेखर गुरव यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

2 9 SEP 2026
सकाळ

# मौनी विद्यापीठात शनिवारी 'मुक्त संवाद'

**गारगोटी :** ग्रामीण व शहरी भागांतील शैक्षणिक दरी तंत्रज्ञानातून कमी करण्याच्या उद्देशाने मौनी विद्यापीठ येथे 'मुक्त संवाद' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शनिवारी (ता. ३) सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत विद्यापीठाच्या जी.टी.सी. कॅम्पस येथे हा संवाद होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत प्रमुख पाहुणे असतील. 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात विषय मांडणार आहेत. गरवारे टेक्निकलचे प्रेसिडेंट डॉ. संजय चऱ्हाटी, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या सीईओ देवश्री पाटील, माजी प्राचार्या डॉ. अनिता बोडके प्रमुख उपस्थित राहतील. मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष, आमदार सतेज पाटील, चेअरमन मधुकर देसाई, संचालक डॉ. पी. बी. पाटील यांच्या उपस्थितीत हा संवाद होणार आहे.

2 9 SEP 2026
तरूण भारत

# मौनी विद्यापीठात बुधवारी शैक्षणिक मुक्त संवाद

त. भा. प्रतिनिधी

**शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत उपस्थित राहणार**

**गारगोटी:** येथील श्री मौनी विद्यापीठाच्या वतीने ग्रामीण भागातील शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, तंत्रज्ञानस्नेही आणि भविष्याभिमुख करण्याच्या उद्देशाने भुदरगड तालुक्यातील शिक्षक व संस्था प्रतिनिधी यांच्यासाठी 'मुक्त संवाद' हा विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे. बुधवारी (दि. ३०) सकाळी ११ वाजता श्री मौनी विद्यापीठातील प्रांगणातील जी. टी. सी. हॉलमध्ये हा कार्यक्रम होईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असतील. नाबार्डचे माजी अध्यक्ष व श्री मौनी विद्यापीठाचे महासंचालक डॉ. यशवंत थोरात हे विषयाची सविस्तर मांडणी करून ग्रामीण शिक्षणाच्या संदर्भातील तंत्रज्ञानाच्या संधी, आव्हाने आणि भविष्यातील दिशा यावर उपस्थितांना मार्गदर्शन करतील. या कार्यक्रमासाठी गरवरे टेक्निकल फायबर्स पुणेचे प्रमुख डॉ. संजय चराटे, डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी देवश्री सतेज पाटील व राजाराम कॉलेजच्या माजी प्राचार्या डॉ. अनिता बोडके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक अंतर वाढण्याची शक्यता आहे. हे अंतर कमी करण्यासाठी ग्रामीण शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील नेतृत्वाने एकत्र येणे आवश्यक आहे. या संवादाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील अडचणी मांडून, अनुभवांची देवाणघेवाण करून ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार तंत्रज्ञानयुक्त शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत ठोस व व्यवहार्य उपायांवर चर्चा घडवून आणली जाईल, हा मुक्त संवाद कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

पत्रकार परिषदेस मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधुकर देसाई, संचालक डॉ. पी. बी. पाटील, कर्मचारी प्रतिनिधी डॉ. अरविंद चौगले, प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे, उपप्राचार्य डॉ. एस. बी. देसाई आदी उपस्थित होते.

2 9 SEP 2026

सकाळ

# मंडलिक अध्यासन केंद्र मंजूर करा; अन्यथा आंदोलन

**मुरगूड :** शिवाजी विद्यापीठात स्व. सदाशिवराव मंडलिक यांच्या नावाने अध्यासन केंद्र तातडीने मंजूर करावे, कोल्हापूर, कागल व मुरगूड येथे त्यांचे चिरंतन स्मारक व पुतळा उभारावा; अन्यथा सात ऑक्टोबरला त्यांच्या जयंतीदिनी हमिदवाडा साखर कारखाना कार्यस्थळावर त्यांच्या पुतळ्यासमोर आत्मक्लेश आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ॲड. दयानंद पाटील-नंद्याळकर यांनी दिला आहे. मागणीचे निवेदन पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांना दिले आहे. कालबद्ध कृती आराखडा तयार करून येत्या सहा ऑक्टोबरपर्यंत जिल्हा प्रशासनाने निर्णय न घेतल्यास सात ऑक्टोबरला मंडलिकप्रेमींकडून आत्मक्लेश आंदोलन छेडण्यात येईल.

2 9 SEP 2026
सकाळ

# 'गाथा स्वातंत्र्य सैनिकांची' ग्रंथाचे गुरुवारी प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्य सैनिकांची' या ग्रंथाचे प्रकाशन गुरुवारी (ता. १ ऑक्टोबर) दुपारी चार वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष आणि कला व साहित्य मंडळ यांच्यातर्फे होणाऱ्या या कार्यक्रमात विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आणि वारणानगर येथील वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या विशेष उपस्थितीत प्रकाशन होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत असतील. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त विद्यापीठाने आपल्या 'शिववाणी' यूट्युब वाहिनीवरून 'गाथा स्वातंत्र्य सैनिकांची' ही दैनंदिन मालिका वर्षभर सलग चालविली. या मालिकेतील स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवनकार्याचे शब्दांकन करून त्याचे ग्रंथरूपात संपादन केले. डॉ. अविनाश पाटील, दत्तात्रय मचाले यांनी संपादन केले आहे.

2 9 SEP 2026

पुढारी

# 'यूजीसी' नेट पात्र उमेदवारांना पीएच.डी. प्रवेश अर्जाची संधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'यूजीसी' नेट जून २०२६ परीक्षेतील इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र विषयांच्या पुनर्परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना पीएच.डी. प्रवेश २०२६-२७ प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने ऑनलाईन अर्ज मागविले आहेत. इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र विषयातील यूजीसी नेट पात्र उमेदवारांसाठी पीएच.डी. प्रवेशाचे ऑनलाइन अर्ज १ ऑक्टोबरपर्यंत भरता येणार आहेत. केवळ यूजीसी नेटमध्ये या तीन विषयांत पात्र ठरलेल्या उमेदवारांनीच अर्ज करावा, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

2 9 SEP 2026

पुढारी

# 'गाथा आपल्या स्वातंत्र्य सैनिकांची' ग्रंथाचे गुरुवारी प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या पूर्वसंध्येला 'गाथा आपल्या स्वातंत्र्य सैनिकांची' ग्रंथाचा प्रकाशन समारंभ आयोजित केला आहे. गुरुवारी, दि. १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी चार वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात कार्यक्रम होईल. इतिहास अधिविभाग, जनसंपर्क कक्ष व कला व साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम होणार आहे. माजी कुलगुरू प्रा. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते आणि वारणानगर येथील वारणा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम होईल. कुलगुरू प्रा. आर. के. कामत अध्यक्षस्थानी असतील.

2 9 SEP 2026

पुढारी

# बी. फार्मसी अभ्यासक्रम प्रवेशाची पहिली फेरी सुरू

**कोल्हापूर :** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत (सीईटी सेल) बी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला अखेर सुरुवात झाली आहे. पहिल्या प्रवेश फेरीसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. ३० सप्टेंबरपर्यंत विद्यार्थ्यांना मिळालेल्या जागेवर प्रवेश निश्चित करता येणार आहे. फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या तुलनेत दरवर्षी विलंब होत आहे. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडून (पीसीआय) जून-जुलैमध्ये महाविद्यालयांची तपासणी केली जात असल्याने प्रवेशासाठी उपलब्ध जागा निश्चित होण्यास विलंब होत आहे. परिणामी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वेळापत्रकावर परिणाम होत आहे. सीईटी सेलने प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले असून, यंदा प्रवेशाच्या चार फेऱ्या होणार आहेत. दुसऱ्या फेरीसाठी १ ऑक्टोबरला रिक्त जागांची यादी जाहीर होणार आहे. २ ते ४ ऑक्टोबर या कालावधीत पर्याय नोंदविता येतील. ६ ऑक्टोबरला पात्र विद्यार्थ्यांची तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध होईल. त्यानंतर १० ते १७ ऑक्टोबरदरम्यान तिसरी, १८ ते २४ ऑक्टोबरदरम्यान चौथी फेरी व २५ ते २९ ऑक्टोबरदरम्यान संस्थास्तरीय प्रवेश फेरी होणार आहे.

29 SEP 2026

पुढारी

# विवेकानंद महाविद्यालयात व्याख्यानास प्रतिसाद

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने बी.एस्सी. व एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांसाठी नेट-सेट तयारी विषयावर ऑनलाईन अतिथी व्याख्यान झाले. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, झरी-जामणी येथील सहायक प्रा. पी. टी. भोयर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी नेट-सेट परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम, अभ्यासाचे नियोजन, संदर्भ साहित्याचा प्रभावी वापर, मागील प्रश्नपत्रिकांचा सराव आणि वेळेचे व्यवस्थापन याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. सूत्रसंचालन डॉ. टी. सी. पाटील यांनी केले. गणेश फडके यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के, एम. एस्सी. समन्वयक डॉ. एस. एस. देसाई यांचे मार्गदर्शन लाभले. व्ही. के. पाटील यांनी आभार मानले.

2 9 SEP 2026

पुढारी

# नाईट कॉलेजचे नियतकालिक स्पर्धेत यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०२४-२५ च्या बिगर व्यावसायिक गटातून नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्समधील प्रांजली पवारला माहितीपर लेखन सूचनालेख लेखन प्रकारात 'तृतीय' क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, संचालक अँड. वैभव पेडणेकर, अँड. अमित बाडकर, प्राचार्य डॉ. उत्तम पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

2 9 SEP 2026
सकाळ



इचलकरंजी : वेटलिफ्टिंग स्पर्धेतील विजेत्या तुळशीदास मेंगणेसह अन्य खेळाडूंचा डीकेएएससी महाविद्यालयात सत्कार झाला.

# 'डीकेएएससी'तर्फे वेटलिफ्टिंगमधील विजेत्या खेळाडूंचा सत्कार

**इचलकरंजी :** जिल्हास्तरीय व विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने यश मिळाले. १७ वर्षांखालील ९८ किलो वजनी गटात तुळशीदास मेंगणे याने १२५ किलो वजन उचलत प्रथम क्रमांक मिळवला. त्याची अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली. विवेक कोंडेकर व संस्कृती माने यांचीही विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. यानिमित्त महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. खाडे यांनी त्यांचा सत्कार केला. उत्तम मेंगणे, क्रीडा संचालक विनायक भोई यांचे मार्गदर्शन मिळाले.

2 9 SEP 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ अध्यक्षपदी डॉ. होनमाने, सचिवपदी डॉ. गायकवाड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी डॉ. धनजय होनमने यांची तर सचिव पदी, डॉ. प्रशांत गायकवाड यांची निवड करण्यात आली. ही निवड शिक्षक संघाने आर्ट्स अॅड कॉमर्स कॉलेज सांगली येथे आयोजित अधिवेशनात करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी शिक्षक संघाच्या डॉ. धनंजय होनमाने यांची तर सचिव पदी डॉ. प्रशांत गायकवाड निवड करण्यात आली. कार्यकारिणीत डॉ. आनंद बल्लाळ उपाध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा, डॉ. विनोद राठोड, उपाध्यक्ष, सांगली जिल्हा डॉ. श्यामसुंदर मिरजकर, उपाध्यक्ष, सातारा जिल्हा, डॉ. प्रशांत गायकवाड, सचिव व खजानीस, डॉ. नंदकुमार विष्णू मोरे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. मनीषा नाईकवडी, डॉ. संभाजी कदम, डॉ. विजया पवार, डॉ. गवराम पोटे, डॉ. देवानंद सोनटक्के, डॉ. मीरा देठे, डॉ. बळवंत मगदूम, डॉ. कांचन नलवडे यांची सदस्य म्हणून निवड केली.



डॉ. धनजय होनमने



डॉ. प्रशांत गायकवाड

2 9 SEP 2026
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाळा-महाविद्यालयांत ई-कचरा जनजागृती

## 'सकाळ'चे पाठबळ; ७० हजारांवर विद्यार्थ्यांचा सहभाग

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : शहरात सुरू असलेल्या ई-वेस्ट रिसायकलिंग वॉरियर स्पर्धेतर्गत ई-कचऱ्याबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत आतापर्यंत १२० हून अधिक शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष जनजागृती सत्रे घेण्यात आली. त्यात हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना ई-कचऱ्याच्या योग्य व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

दरम्यान, पृथ्वी झिरो वेस्ट फाउंडेशनच्या पुढाकाराने व महापालिकेच्या सहकार्याने हा उपक्रम होत असून, 'सकाळ'चे या उपक्रमाला

सकाळ
FOUNDATION
PRUTHVI
ZERO
WASTE
Billion Hands For Clean Earth.

पाठबळ आहे.

मार्गदर्शन सत्रांत ई-कचरा म्हणजे काय, तो सामान्य कचऱ्यात का टाकू नये, भंगाराच्या अनधिकृत साखळीतून होणाऱ्या चुकीच्या विल्हेवाटीचे पर्यावरण व आरोग्यावर होणारे परिणाम आणि अधिकृत रिसायकलमार्फत ई-कचऱ्याचे सुरक्षित पुनर्चक्रण कसे होते, याबाबत संवादात्मक पद्धतीने माहिती दिली.

मोहिमेचा उद्देश केवळ विद्यार्थ्यांत जागृती निर्माण करणे नसून, प्रत्येक विद्यार्थ्यामार्फत हा संदेश त्याच्या कुटुंबापर्यंत पोहोचवून घराघरांतील जुना व वापरात नसलेला ई-कचरा योग्य रिसायकलिंग सिस्टीममध्ये आणणे हा आहे.

आता स्पर्धा प्रत्यक्ष संकलनाच्या टप्प्यात प्रवेश करत आहे. विद्यार्थ्यांना आपल्या घरातील जुने मोबाईल, चार्जर, केबल्स, इलेक्ट्रॉनिक उपकरणे यांची पाहणी करण्याचे आवाहन केले आहे. लहान ई-कचरा शाळा-महाविद्यालयांमध्ये जमा केला जाणार असून, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, एसी यांसारख्या मोठ्या वस्तूंसाठी घरातून संकलनाची व्यवस्था केली जाणार आहे.

२ ते ४ ऑक्टोबरदरम्यान घरगुती मोठ्या ई-कचऱ्याचे संकलन, तर ५ ते १० ऑक्टोबरदरम्यान शाळा-महाविद्यालयांमधून ई-कचरा संकलन केले जाणार आहे. विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा-महाविद्यालये आणि विविध सामाजिक व औद्योगिक संस्थांच्या सहभागातून कोल्हापूरमध्ये जबाबदार ई-कचरा व्यवस्थापनाची संस्कृती निर्माण करण्याचा या उपक्रमाचा प्रयत्न आहे.

2 9 SEP 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिक्षक, पदवीधर'ची आजपासून रणधुमाळी

## दोन दिवसांत जागा वाटप : सहा ऑक्टोबर अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : पुणे पदवीधर व शिक्षक विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी उद्यापासून (ता. २९) सुरू होत आहे. या निवडणुकीसाठी उद्यापासून सहा ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया होईल. पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयात ही प्रक्रिया सुरू होणार आहे.

दरम्यान, महाविकास आघाडीसह महायुतीत या दोन्ही मतदारसंघांच्या जागा वाटपाचा तिढा अजून कायम आहे. दोन दिवसांत दोन्हीही आघाड्यांची मुंबईत बैठक होत असून, त्यात यावर शिक्कामोर्तब होईल.

सध्या शिक्षक मतदारसंघातून कोल्हापूरमधून काँग्रेसचे आमदार प्रा. जयंत आसगावकर प्रतिनिधीत्व करत आहेत, तर पदवीधरमधून सांगली जिल्ह्यातून राष्ट्रवादीचे अरुण लाड आमदार आहेत. महाविकास आघाडीत ज्यांची जागा त्याच पक्षाला सोडण्याचा निर्णय जवळपास झाला आहे, त्याची औपचारिक घोषणा बाकी आहे. त्यामुळे शिक्षक मतदारसंघ काँग्रेसला, तर पदवीधर मतदारसंघ राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला जाण्याची शक्यता आहे.

पदवीधरची सहा वर्षांपूर्वीची निवडणूक त्यावेळच्या एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेसने जिंकल्याच्या जोरावर या जागेवर राष्ट्रवादी अजित पवार पक्षाने हक्क सांगितला आहे. त्यांच्याकडून कोल्हापूर जिल्हा बँकेचे संचालक प्रताप माने यांचे नाव पुढे आहे. त्यांच्यासाठी मंत्री हसन मुश्रीफ यांनी आपली राजकीय ताकद पणाला लावली आहे. पण, आमदार अरुण लाड यांचे पुत्र शरद यांनी ही निवडणूक डोळ्यापुढे ठेवून भाजपमध्ये प्रवेश केल्याने ही जागा आपल्याला मिळावी, यासाठी भाजपचे प्रयत्न सुरू आहेत.

महायुतीत शिक्षक मतदारसंघाच्या जागेसाठी मोठी रस्सीखेच आहे. सहा वर्षांपूर्वी भाजपने पाठिंबा दिलेले माजी आमदार दत्ता सावंत, कोल्हापुरातील विवेकानंद शिक्षण संस्थेचे सचिव कौस्तुभ गावडे भाजपकडून इच्छुक आहेत. शिवसेना शिंदे पक्षांकडूनही वैद्यकीय कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांचे उमेदवारीसाठी प्रयत्न सुरू आहेत.

### प्रताप माने यांच्या पत्रकावर मुश्रीफांचा फोटो नाही

**■ पदवीधरच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी अजित पवार पक्षांकडून इच्छुक असलेल्या प्रताप माने यांनी आज प्रसिद्ध केलेल्या पत्रकावर त्यांच्या उमेदवारीसाठी प्रयत्न करणारे मंत्री हसन मुश्रीफ यांचाच फोटो गायब आहे. यावर मुश्रीफ म्हणाले, 'माने यांच्या मनात काय चाललंय हे मला माहीत नाही; पण त्या पत्रकावर स्वर्गीय अजित पवार यांचा फोटो आहे.'**

2 9 SEP 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अँकर

मास कम्युनिकेशन, बी. ए. फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांची चित्रनगरीला भेट : अनुभवले पडद्यामागचे विश्व

# विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी घेतले चित्रपट निर्मितीचे धडे

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

पडद्यावर दिसणारे गाव, वाडे, पोलीस ठाणे, रुग्णालय, महाविद्यालय, रेल्वे स्टेशन किंवा मंदिर प्रत्यक्षात कसे उभे केले जाते, याचा प्रत्यक्ष अनुभव शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन आणि बी.ए. फिल्म मेकिंग विभागाच्या विद्यार्थ्यांनी घेतला. कोल्हापूर चित्रनगरीतील विविध चित्रीकरण स्थळांना भेट देत विद्यार्थ्यांनी चित्रपट निर्मिती आणि कलादिग्दर्शनामागील सर्जनशीलतेचे बारकावे जाणून घेतले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन व बीए फिल्म मेकींगच्या विद्यार्थ्यांनी चित्रनगरीतील सेट निर्मितीची माहिती घेतली.**

मास कम्युनिकेशन आणि बी.ए. फिल्म मेकिंग विभागातील प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. अभ्यासक्रमातील चित्रपट निर्मितीच्या संकल्पना प्रत्यक्ष चित्रीकरणाच्या वातावरणात समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना या भेटीत मिळाली.

चित्रनगरीतील जुना वाडा, नवा वाडा, चाळ, बंगला, गावभाग तसेच मालिकेसाठी उभारण्यात आलेला क्रोमा फ्लोअर विद्यार्थ्यांनी पाहिला. याशिवाय सुरू असलेल्या दोन–तीन चित्रीकरण फ्लोअर्सनाही विद्यार्थ्यांनी भेट दिली. एकाच इमारतीत वेगवेगळ्या कथानकांसाठी पोलीस ठाणे, रुग्णालय, घर, महाविद्यालय आणि शासकीय कार्यालय उभारण्यात आल्याचे विद्यार्थ्यांनी पाहिले.

रेल्वे स्टेशन, नदीघाट आणि मंदिराचे सेट्सही विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेत होते. प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेली ठिकाणे मर्यादित जागेत आणि उपलब्ध साधनसामग्रीच्या आधारे पडद्यावर विश्वासार्ह दिसतील अशा पद्धतीने कशी साकारली जातात, याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. चित्रनगरीचे कर्मचारी विक्रम विष्णू वडर आणि सचिन कुडचे यांनी विद्यार्थ्यांना विविध लोकेशन्सची माहिती देत संपूर्ण परिसराची सफर घडवून आणली. दरम्यान, अभिनेते उमेश बोळके आणि 'मालिकेतील बाल

**पोलीस ठाणे, रुग्णालयापासून रेल्वे स्टेशनपर्यंत हुबेहूब निर्मिती**

विष्णूची भूमिका साकारणारा बालकलाकार तक्षशील भोसले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिक्षक अनुप जत्राटकर आणि डॉ. कविता गगराणी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ही शैक्षणिक भेट यशस्वी करण्यासाठी मास कम्युनिकेशन आणि बी.ए. फिल्म मेकिंग विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि कोल्हापूर चित्रनगरीचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप भांदिगरे यांचे विशेष सहकार्य लाभले.

2 9 SEP 2026
लोकमत

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहिरात

शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणालीमार्फत नवीन महाविद्यालय व नवीन विद्याशाखा इ. सुरू करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Affiliation ➝ Affiliation T-२ ➝ Information Lists या लिंकवर विद्यापीठाची विस्तृत जाहिरात, शासन निर्णय, शासन पत्र व वार्षिक बृहत आराखडा मान्यता प्राप्त स्थळ बिंदूची यादी, तसेच सदरचे प्रस्ताव New College Permission System (NCPS) https://htedu.maharashtra.gov.in/NCPS या ऑनलाईन प्रणालीमार्फत संस्थेने / महाविद्यालयाने विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणेबाबतचे पत्र ठेवण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरून शासन मान्यतेच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२७-२८च्या वार्षिक बृहत आराखड्यानुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक संस्था, संलग्न महाविद्यालये यांनी दि. ३०-०९-२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणालीमार्फतच विद्यापीठ कार्यालयीन वेळेतच प्रस्ताव ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

तसेच भारतीय विधिज्ञ परिषदेने दि. ०५-०३-२०२६ रोजीच्या नोटिफिकेशनद्वारे ०३ वर्षांचा मोराटोरिअमचा कालावधी रद्द केलेला आहे. त्यामुळे विधि महाविद्यालयांसाठी दि. १८-०९-२०२५ शासन निर्णयामधील तरतुदीनुसार NCPS या ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रस्ताव सादर करावेत.

**उपरोक्त शासन पत्राच्या अनुषंगाने पोस्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.**

प्रथम शुल्क बँकेत जमा करून प्रस्ताव दि. ३०/०९/२०२६ नंतर सादर करता येणार नाही. शुल्क व ऑनलाईन भरलेल्या प्रस्तावाची प्रत एकाचवेळी या कार्यालयास दि.३०/०९/२०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. पोस्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव तसेच विलंबाने पोहोच होणारे प्रस्ताव व शुल्क यावर कार्यवाही केली जाणार नाही.

**टीप : शासनाकडून मंजूर केलेल्या स्थळ बिंदूनुसारच संस्था / महाविद्यालयांनी ऑनलाईन (Online) अर्ज भरावेत.**

सही/-

क्र. शिवाजीवि/संलग्नता/टी-२/१५०४

दिनांक : २९-०९-२०२६

**डॉ. व्ही. एन. शिंदे**

कुलसचिव